बातमीपत्र

**पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर**

**माहिती कक्ष, दि ०३ डिसेंबर २०२३**

## फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ६८६/२०२३ भादवि ४२० प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | ०१/१२/२०२३ रोजी १३.३० वा चे सुमारास, मुथुट फायनान्स ऑफिस खाली, शितल हॉटेल शेजारी, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०३/१२/२०२३ रोजी १५.१८ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | उदय शरदराव कुलथे, वय- ३९ वर्षे, रा. घर नं. ८३/१९, भवानी पेठ, मड्डी वस्ती, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | मोबाईल क्रं. ७०५८३३२१९२ चा धारक हार्षल पुर्ण नाव पत्ता माहित नाही |
| **फसवणुक र** | : | २,९०,०००/- रुपये |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, यातील फिर्यादी यांचे सराफ कट्टा मधला मारुती येथे अभय कुलथे नावाचे सोन्याचे दुकान आहे. मुथुट फायनान्स, शितल हॉटेल शेजारी येथिल मॅनेजर गुरुदत्त वाघमारे यांचेशी ओळख आहे. मॅनेजर यांनी जर कोणी ग्राहक सोने इतरत्र गहान ठेवण्यासाठी आले किंवा त्यांनी इतरत्र सोनारांकडे सोने गहाण ठेवले असेल तर त्यांना फायनान्स मध्ये कमी व्याजदराने कर्ज देऊ त्यासाठी तुम्ही मदत करा असे सांगितले होते व त्यांना फायनान्स मधुन रक्कम मिळेपर्यंत रक्कमेची व्यवस्था करीत जावा त्या पोटी फिर्यादीला १ टक्का ग्राहकाकडुन कमीशन मिळत असे<br>वरील वेळी व ठिकाणी, मुथुट फायनान्सचे मॅनेजर गुरुदत्त वाघमारे यांनी फोन करुन सांगितले की एका ग्राहकाचे सोने रेवणकर सराफांकडे तारण ठेवले असुन ते सोडविण्यासाठी २,९०,०००/- रु लागणार आहेत त्याची तरतुद करुन ग्राहकास द्या. व ग्राहकास तुमचा मोबाईल नंबर दिला व ते तुम्हाला कॉल करतील असे सांगितले. त्यानंतर थोडयाचा वेळात ७०५८३३२१९२ या नंबरवरुन फिर्यादीस कॉल आला व त्यांनी मी हर्षल बोलतो आहे मला फायनान्स येथील साहेबांनी तुमचा नंबर दिला आहे माझे सोने सोडविण्यासाठी साहेबांनी सांगितल्या प्रमाणे २,९०,०००/- रु स्वरुपात दया. मी फायनान्स ऑफिसच्या खाली थांबलेलो आहे असे कळविल्याने फिर्यादी व सोबत सौरभ जोजारे असे मुथुट फायनान्स ऑफिसच्या खाली दाखल झाले व तेथुन वरील क्रमांकावर कॉल केला असता एक ३० ते ३५ वयाचा इसम फोनवर बोलत फिर्यादीकडे आला मीच हर्षल आहे माझेच सोने सोडविण्यासाठी फोन केला होता. सदरची रक्कम माझ्याकडे दया असे म्हणाल्याने फिर्यादीने सदरची रक्कम त्याच्या ताब्यात दिली. त्याने सदरची रक्कम नेवून तुम्ही तुमची गाडी घ्या आपण सराफाकडे जावू असे म्हणाल्याने फिर्यादी बाजुला लावलेली गाडी वळवून घेई पर्यंत सदरचा आरोपीत इसम हा तेथुन निघुन गेला. सदर इसमाचा शोध घेतला असता तो मिळुन आला नाही. मोबाईल क्रंमांकावर संपर्क केला असता तो बंद लागत होता. त्याचे पुर्ण नाव पत्ता माहित नाही सदर आरोपीत इसमाची आजपावेतोपर्यंत वाट पाहिली असता परत न आल्याने व त्याचा मोबाईल देखील बंद लागत असल्याने वरील आरोपीताने फिर्यादीची फसवणुक केली आहे म्हणून. तपास:- पोनि/ देशमुख- **९४२१०८५८८८** |